# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

**प्रसिद्धी पत्रक** **ता. ६ डिसेंबर २०१९**

# संकल्पनगर उद्यान सौंदर्यीकरण कामाचे भूमिपूजन

## मनपाच्या ४० लक्ष निधीतून होणार उद्यानाचा कायापालट

**नागपूर, ता.६ :** संकल्पनगर वाठोडा लेआउट येथील उद्यानाच्या सौंदर्यीकरणाचे शुक्रवारी (ता.६) पूर्व नागपूरचे आमदार कृष्णा खोपडे यांच्या हस्ते भूमीपुजन झाले. मनपाच्या नेहरूनगर झोन सभापती समिता चकोले यांच्या ४० लक्ष रूपये निधीमधून उद्यानामध्ये विविध सौंदर्यीकरणाचे काम केले जाणार आहे.

सौंदर्यीकरण कार्याच्या भूमीपुजन समारंभाप्रसंगी उपमहापौर मनिषा कोठे, नेहरूनगर झोन सभापती समिता चकोले, भाजपचे प्रभाग अध्यक्ष राजेश संगेवार, प्रदीप निनावे, पूर्व नागपूरचे महामंत्री देवेंद्र काटोलकर, महिला प्रभाग अध्यक्ष सुनीता कांबळे, कल्पना सार्वे, माजी प्रभाग अध्यक्ष राजेंद्र चकोले आदी उपस्थित होते.

संकल्पनगर वाठोडा लेआउट उद्यानामध्ये सौंदर्यीकरण कामांतर्गत ४० लक्ष रूपये निधीमधून योगा शेड, ग्रीन जिम, ॲक्यूप्रेशन टाईल्सचे वॉकींग ट्रॅक, पावसाळी लाईन, महिला व पुरूषांसाठी प्रसाधनगृह, बोरवेल आदींची व्यवस्था

करण्यात येणार आहे, अशी माहिती यावेळी नेहरूनगर झोन सभापती समिता चकोले यांनी दिली.

उद्यानाच्या सौंदर्यीकरणामुळे स्थानिक ज्येष्ठ नागरिक, महिला यांच्यासह बालगोपालांनाही फिरायला व खेळण्यासाठी हक्काची जागा उपलब्ध होणार आहे. या उद्यानाचे कार्य लवकर सुरू करून ते वेळेत पूर्ण करण्याबाबत संबंधित पदाधिका-यांनी पाठपुरावा करण्याचे आवाहन पूर्व नागपूरचे आमदार कृष्णा खोपडे यांनी केले.